आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

३ एप्रिल २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- २०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकासदर साडेसात टक्के राहील, असा जागतिक बँकेचा सुधारित अंदाज

- केरळमध्ये वायनाड मतदारसंघातून काँग्रेसनेते राहुल गांधी यांचा उमेदवारी अर्ज दाखल

- महाराष्ट्रासह सहा राज्यात निवडणूक आयोगाकडून विशेष निरीक्षकांची नियुक्ती

- तैवानमधे शक्तिशाली भूकंपानंतर सुनामी

- छत्रपती संभाजीनगर छावणी परिसरात लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू

**आणि**

- जागतिक महिला भारोत्ताेलन स्पर्धेत भारताच्या इंद्रायणी देवीला कांस्य पदक

**<><><><><>**

२०२४ या आर्थिक वर्षात भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास साडेसात टक्के दरानं होईल, असा सुधारित अंदाज जागतिक बँकेनं व्यक्त केला आहे. जागतिक बँकेनं आधी या वर्षासाठी जो अंदाज व्यक्त केला होता त्यात एक पूर्णांक दोन दशांश टक्क्यांची वाढ करून हा सुधारित अंदाज जाहीर करण्यात आला आहे. दक्षिण आशिया विकासासंदर्भातल्या ताज्या अहवालात ही माहिती दिली आहे. येत्या दोन वर्षांत दक्षिण आशिया हा विभाग जागतिक पातळीवर सर्वाधिक विकसनशील

विभाग ठरेल, आणि २०२५ या वर्षात त्याचा विकासदर सहा पूर्णांक एक दशांश टक्के असेल, असंही या अहवालात म्हटलं आहे.

<><><><>

केरळातल्या वायनाड लोकसभा मतदारसंघासाठी आज काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. तत्पूर्वी त्यांनी कलपेट्टा इथं एका रोड शोचं नेतृत्व केलं. त्यांच्यासोबत पक्षाच्या सरचिटणीस प्रियांका गांधी, के सी वेणुगोपाळ आणि इतर नेते उपस्थित होते. एलडीएफ उमेदवार ॲनी राजा हेही आज अर्ज दाखल करणार आहेत. केरळचे राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे उमेदवार आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष के सुरेंद्रन हे या मतदारसंघातून उद्या अर्ज भरणार आहेत. त्यामुळे या मतदारसंघात तिरंगी लढत होणार आहे. केरळात दुसऱ्या टप्प्यात या महिन्याच्या २६ तारखेला मतदान होणार आहे. उद्या उमेदवारी अर्ज भरण्याची शेवटची तारीख आहे. पाच तारखेला छाननी होईल, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत आठ तारखेपर्यंत आहे.

<><><><>

केंद्रीय मंत्री डॉ. एल मुरुगन यांच्यासह राज्यसभेच्या ११ सदस्यांना उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी आज पद आणि गोपनियतेची शपथ दिली. महाराष्ट्रातल्या मेधा कुलकर्णी आणि चंद्रकांत हंडोरे यांचाही त्यात समावेश आहे. या आठवड्यात माजी प्रधानमंत्री मनमोहन सिंग यांच्यासह वरिष्ठ सभगृहातले ५६ सदस्य निवृत्त झाले आहेत.

<><><><>

मध्य प्रदेश मध्ये लोकसभेच्या ७ जागांसाठी आज २१ जणांनी २७ नामांकन पत्र दाखल केली. या जागांवर या महिन्याच्या २६ तारखेला निवडणूक होणार आहे. काल भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे पी नड्डा यांनी जबलपूर आणि शाहडोल इथं

प्रचार सभा घेतल्या. भाजपा नेत्या स्मृती इराणी आज खजुराहो इथं प्रचार सभेत उपस्थित राहणार आहेत. काँग्रेसनेते आणि माजी मुख्यमंत्री कमलनाथ यांनी काल छिंदवाडा इथं सभेला संबोधित केलं. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष जयवर्धन सिंग यांनीही अनेक ठिकाणी प्रचार सभांना संबोधित केलं.

**<><><><>**

जम्मू - काश्मीर मध्ये उधमपूर मतदार संघात या महिन्याच्या १९ तारखेला पहिल्या टप्प्यातली निवडणूक होणार आहे. यासाठी १२ उमेदवार रिंगणात आहेत. या मतदार संघात एकूण १६ लाख २३ हजार १९५ मतदार आहेत.

**<><><><>**

निवडणूक आयोग आज दुपारी राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातल्या कायदा अंमलबजावणी सं◌ंस्थांची आढावा बैठक घेणार आहे. कायदा आणि सुव्यवस्था स्थिती, अनुचित प्रकारांना आळा घालणं तसंच आंतरराज्यीय सीमा आणि आंतरराष्ट्रीय सीमांवर देखरेख याबद्दलचा आढावा या बैठकीत घेतला जाईल. काल आयोगानं सात कोटी पेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या महाराष्ट्रासह पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश आणि बिहार या चार  राज्यांमधे तसंच आंध्र प्रदेश आणि ओदिशा या दोन राज्यांत जिथं विधानसभेच्या निवडणुकाही होणार आहेत अशा एकूण सहा राज्यात विशेष निरीक्षकांची नियुक्ती केली आहे.

**<><><><>**

इयत्ता पहिली, दुसरी, सातवी, आठवी, दहावी आणि बारावीची ३३ लाख शालेय पाठ्यपुस्तकं देशभरातल्या पुस्तक विक्रेत्यांकडे पाठवल्याचं एन सी ई आर टी, अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेनं म्हटलं आहे. अन्य इयत्तांची पुस्तकं या महिन्यात उपलब्ध होतील. पालक आणि विद्यार्थ्यांनी

घाबरण्याचं कारण नाही, असंही परिषदेनं म्हटलं आहे. बाजारात पुस्तकं उपलब्ध नसल्याच्या बातम्यांवर आज परिषदेनं हे स्पष्ट केलं.

**<><><><><>**

तैवानमध्ये पूर्व किनारी भागात आज झालेल्या भूकंपात किमान ७ जण ठार तर ७०० हून अधिक जण जखमी झाले आहेत. ७ पूर्णांक ४ रिक्टर क्षमतेचा हा धक्का होता. प्राथमिक अहवालानुसार हुआलियन शहरातल्या अनेक इमारती कोसळल्या असून त्यात अनेक लोक अडकल्याचा अंदाज आहे. जपानच्या वेळेनुसार सकाळी सव्वा नऊच्या सुमाराला योनागुनी बेटावर ३० सेंटीमीटर सुनामीची नोंद झाली. सुनामीचा इशारा अजून कायम आहे. भूकंपाचा केंद्रबिंदू तैवानच्या हुआलियन शहरापासून १८ किलोमीटर दक्षिणेला समुद्रात सुमारे १९ किलोमीटर खोलीवर होता. प्राथमिक अहवालानुसार हुआलियन शहरातल्या अनेक इमारती कोसळल्या आहेत. चीनच्या दक्षिण-पूर्व फुजियान प्रांतातही भूकंपाचे धक्के जाणवले. भूकंपासंदर्भात मदतीसाठी ०९०५२४७९०६ आपत्कालीन क्रमांकावर आणि ad.ita@mea.gov.in या संकेतस्थळावर संपर्क साधता येईल, असं भारत तैपेई संघटनेनं सांगितलं आहे.

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगर मधल्या छावणी परिसरातल्या एका तीन मजली इमारतीला आज लागलेल्या आगीत ७ जणांचा मृत्यू झाला. यात ३ महिलांसह २ बालकांचा समावेश आहे. घटनेची माहिती मिळताच परिसरातल्या नागरिकांनी बचावकार्य करण्याचा प्रयत्न केला तसंच पोलिस आणि अग्निशमन दलानं घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत सात जणांचा मृत्यू झाला होता. आगीचे कारण अद्याप कळालेलं नसून पोलीस अधिक तपास करत आहेत.

**<><><><><>**

येत्या उन्हाळ्यात विजेची मागणी पूर्ण करण्यासाठी सरकार सर्व ती पावलं उचलत असल्याचं केंद्रीय ऊर्जा तसंच नवीन आणि अक्षय ऊर्जा मंत्री आर के सिंग यांनी सांगितलं. यासंदर्भात अनेक बैठका झाल्यानंतर ते काल नवी दिल्लीत बोलत होते. उन्हाळ्यात अजिबात भारनियमन केलं जाऊ नये यावर त्यांनी भर दिला. त्यांनी वीज उत्पादक कंपन्यांशीही या विषयावर चर्चा केली आणि देशातल्या वीज साठ्याचा आढावा घेतला. यंदाच्या उन्हाळ्यात वायव्य, ईशान्य, मध्य आणि द्वीपकल्पीय भारत वगळता देशभरात कमाल आणि किमान तापमान सरासरीपेक्षा अधिक राहण्याचा अंदाज हवामान खात्यानं वर्तवल्यामुळे यंदा विजेची मागणी अधिक असेल, त्यामुळे सरकार त्यासाठी पूर्वतयारी करत आहे.

**<><><><>**

थायलंड मधल्या फुकेत इथं सुरू असलेल्या जागतिक महिला भारोत्तोलन स्पर्धेत भारताच्या इंद्रायणी देवीनं ५९ किलो वजनी गटात आज कांस्य पदक पटकावलं. देवीनं एकूण १९६ किलो वजन उचललं. उत्तर कोरियाच्या कँग ह्यॉन ग्याँगला सुवर्ण आणि वॅलेंशियाच्या कँबी मिहेलाला रौप्य पदक मिळालं. राष्ट्रकूल स्पर्धेत इंद्रायणी देवीनं रौप्य पदक पटकावलं होतं.

**<><><><>**

परदेशी गुंंतवणूकदारांचा आशावाद आणि देशावरचा विश्वास यामुळं भांडवली बाजार उच्च मूल्यनिर्धारण करत असल्याचं सेबी अर्थात भारतीय रोखे आणि विनिमय महामंडळाच्या अध्यक्ष माधुरी पुरी बुच यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल भारतीय उद्योग महासंघातर्फे आयोजित १७ व्या कॉर्पोरेट प्रशासन परिषदेचं उद्घाटन करताना त्या बोलत होत्या. जीएसटी संकलनातली वाढ, आगाऊ कर भरणा, वीज आणि ऊर्जेचा वापर यामध्ये भारतीय अर्थव्यवस्थेची ताकद

दर्शवणाऱ्या आकडेवारीमुळे परदेशी गुंतवणूकदारांना प्रोत्साहन मिळत असल्याचं त्यांनी म्हटलं.

**<><><><><>**

इस्त्रायलाच्या सशस्त्र दलानं काल गाझाच्या वर्ल्ड सेंट्रल किचन या मानवतावादी गटाच्या ताफ्यावर अनावधानानं हल्ला केला असं इस्त्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी म्हटलं आहे. या हल्ल्यात सहा मदत कर्मचारी आणि एक पॅलेस्टिनी चालक ठार झाला आहे. या घटनेबद्दल दुःख असल्याचं नेतन्याहू यांनी म्हटलं आहे. दरम्यान, या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून, वर्ल्ड सेट्रंल किचननं गाझामध्ये अन्न मदत वितरीत करण्याचे कार्य स्थगित केलं आहे.

**<><><><><>**

भारताशी असलेले पाकिस्तानचे संबंध तिथल्या निवडणुकीनंतर अधिक सुधारतील अशी आशा पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा असिफ यांनी व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज विशाखापट्टणम इथं दिल्ली कॅपिटल्सचा सामना कोलकाता नाईट राईडर्सशी होणार आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं आपल्यासाठी सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण चंद्रपूर लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत

आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम आपल्याला ऐकता येईल.

**//<><><><><>//**

आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
३ एप्रिल २०२४ - बुधवार